**पुनर्शपथेवर पुढील उलटतपास जाबदार यांचेतर्फे**

**विधीज्ञ श्री. एस. एस. मुतालिक यांच्यामार्फत सुरू**

१२.	मी ग्रामपंचायतीत कार्यरत असताना माझेसोबत सदाशिव मोरे, मारूती सकट, काशिनाथ शिरतोडे, मनोहर झेंडे हे कार्यरत होते. ग्रामपंचायतीच्या प्रचलित नियमानुसार कामगाराने हजर झालेनंतर हजेरीपुस्तकात सहया कराव्या लागतात. त्यापध्दतीने मी माझे सेवा कालावधीत ग्रामपंचायतीच्या हजेरीपुस्तकात सहया केलेल्या आहेत.

१३.	निशाणी सी—६ कडील हजेरीपुस्तकाची छायांकीत प्रत मला आता दाखविली. त्यावर दि. ०१/०४/२०२२ ते १३/०४/२०२२ हयामध्ये माझे नावापुढे माझी सही आहे. दि. १४/०४/२०२२ पासून मी कामावर नसल्याने माझे नावापुढे गैरहजर अशी नोंद आहे. सदरची नोंद एप्रिलअखेर आहे. सदर दस्तास **निशाणी सी—११** देण्यात आला.

१४.	एप्रिल—२०२२ मध्ये जाबदार ग्रामपंचायतीकडे ग्रामविकास अधिकारी कोण होते हे मला माहिती नाही. सफाई कामगार म्हणून मी, श्री. झेंडे आणि लक्ष्मण चव्हाण कार्यरत होते. ग्रामपंचायत रेकॉर्डप्रमाणे हजर असणा—या कालावधीत मला पगार अदा करण्यात येत होता. आमचा पगार खात्यात जमा होतो. माहे एप्रिल—२०२२ चा १३ दिवसांचा पगार माझे खात्यात जमा झालेला आहे. एप्रिल—२०२२ मध्ये ग्रामपंचायतीकडून मला लेखी आदेश दिलेला नव्हता.

१५.	आमची ग्रामपंचायत ही लोकसंख्येच्या हिशोबाने छोटी ग्रामपंचायत आहे. मी ग्रामपंचायतीमध्ये मला मद्यसेवनाचे व्यसन असल्याने मद्यसेवन करून कर्तव्यावर जात होतो हे म्हणणे खरे नाही. मी मद्यप्राशन करून ग्रामस्थांना त्रास देत असलेबाबतच्या तक्रारी होत्या हे म्हणणे खरे नाही.

१६.	वेळोवेळी निवडून येणारे लोकप्रतिनिधी ग्रामपंचायतीचे प्रतिनिधीत्व करीत असतात. सन २०१८ साली लोकप्रतिनिधी कोण होते याबाबतचा तपशिल मी दाखल केलेला नाही. सन २०१८ साली दाखल केलेल्या प्रकरणात

लोकअदालतीमध्ये तडजोड झाली होती त्याचा तडजोडनामा मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. सन २०१८ मध्ये वाद काय होता आणि त्या प्रकरणी काय लाभ मिळाले याचा तपशिल मी दाखल केलेला नाही. सन २०१८ साली जे लोक प्रतिनिधी होते ते सन २०२२ साली नव्हते. सन २०१८ साली जे ग्रामसेवक होते ते सन २०२२ साली नव्हते. सन २०२२ मध्ये जे लोक प्रतिनिधी निवडून आले ते कधी निवडून आले हे मला माहिती नाही. ग्रामसेवकाला जुन्या रेकॉर्डबद्दल माहिती नसल्याने मला विचारणा झाली नाही.

१७.        दि. १४/०४/२०२२ पासून मी कामावर गैरहजर असलेबाबत रजा रेकॉर्ड हजर केलेले नाही. मी कामावर हजर होताना गैरहजेरीची कारणे आणि हजेरी अहवाल दाखल केला नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की आम्हाला कामावर हजर होताना  अर्ज द्यावा लागत नाही. दि. १४/०४/२०२२ पासूनच्या गैरहजेरीबाबत मी ग्रामपंचायतीला अर्ज दिला नाही.

१८.        आमच्या कामाची वेळ सकाळी ६:०० ते ९:००, ९:०० ते १२:०० आणि १२:०० ते ५:०० अशा शिप्टमध्ये चालते. ग्रामपंचायत कार्यालय हे शिपाई उघडतात आणि बंद करतात. ग्रामपंचायतीचे कार्यालय सकाळी ९:३० वाजता उघडले जाते. संध्याकाळी सुट्टी झाल्यानंतर आम्ही हजेरी नोंद करतो. मी माहे मे—२०२२ मध्ये ग्रामपंचायतीकडे कामास हजर होवून काम केले होते. मे—२०२२ मध्ये मी पुर्ण महिना काम केले होते. मे—२०२२ चा पगार मला मिळाला होता. त्याचे रेकॉर्ड मी हजर केलेले नाही. दि. ०७/०२/२०२३ रोजी ग्रामपंचायतीने कैफियत दिल्यानंतर मी ग्रामपंचायतीकडे गेलो नव्हतो. ग्रामपंचायतीच्या हजेरीपुस्तकात माझे नाव आहे किंवा नाही हे मी पाहिलेले नाही.

१९.        ग्रामपंचायतीने मला कारणे दाखवा नोटीस अथवा आरोपपत्र दिलेले नाही. ग्रामपंचायतीने मला मालक—नोकर या आशयाचे नाते संपलेबाबत लेखी नोटीस दिलेली नाही. ग्रामपंचायत क्षेत्रात देशी दारूचे दुकान आहे. सदर दुकान ग्रामपंचायतीच्या पदाधिका—याच्या मालकीचे आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. त्यांचे दुकानात मी सध्या काम करीत आहे हे म्हणणे खरे नाही. मी त्यांचे

दुकानात पूर्वी काम करीत होतो. दुकानाच्या मालकाचे नाव मला माहिती नाही. मी चालू महिन्यात आठ दिवस त्यांचेकडे काम केले आहे. सन २०२२ ते आठ दिवसापूर्वीपर्यंत मी त्या दुकानात काम करीत होतो. त्याबाबतचे कथन मी सरतपासात नमूद केलेले नाही.

२०. ग्रामपंचायतीने माझेसोबतचे मालक–नोकर नाते कधीही संपुष्टात आणले नव्हते याबाबत मला कधीही कळविले नाही. मी जाबदार ग्रामपंचायतीविरूध्द खोटी केस दाखल केली आहे हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

उलटतपासणी पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती

**सही/—**

स्थळ : सांगली

( एस. जी. कोरे )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली

दि. ०८/१०/२०२५